शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३४५ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

### सुट्टीची सुचना

स्वातंत्र्यदिनानिमित्त दैनिक युवा आदर्श कार्यालयाला सुट्टी असल्यामुळे दिनांक १६ ऑगस्ट २०२६ वार सोमवार चा अंक प्रकाशित होणार नाही. याची जाहिरातदार, वाचक, हिंतचितक यांनी नोंद घ्यावी

-व्यवस्थापक

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282




# मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प -मुख्यमंत्री फडणवीस

भाजपच्या जिल्हा कार्यालयाच्या नवीन इमारतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन; लाडकी बहीण योजना सुरूच राहणार, शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठ्याचा दावा








**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्याच्या विकासात कोणतीही कमतरता पडू देणार नाही. जालना हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा औद्योगिक जिल्हा म्हणून प्रस्थापित करण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. आगामी काळात जालन्याची ओळख 'स्टील, सिड आणि सिल्क' अर्थात 'ट्रिपल एस' अशी निर्माण झाली पाहिजे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.भारतीय जनता पार्टीच्या जालना जिल्हा कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पालकमंत्री पंकजा मुंडे, माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल, भाजप जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'भाजप कार्यालय म्हणजे कार्यकर्त्यांचे हक्काचे घर' नवीन कार्यालयाच्या भूमिपूजनाचा संदर्भ देताना फडणवीस म्हणाले की, जालन्यात भाजपचे कार्यालय म्हणजेच भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याचे हक्काचे घर तयार होत आहे, याचा आपल्याला आनंद आहे. पक्षाच्या संघटनात्मक विस्तारासाठी कार्यालय महत्त्वाचे असून, कार्यकर्त्यांना एकत्रितपणे काम करण्यासाठी हे केंद्र ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

**मोदींच्या नेतृत्वाखाली भारत चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था**

देशाच्या आर्थिक प्रगतीचा उल्लेख करत फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनल्याचे सांगितले. देशात मोठे उद्योग येत असून भारताला विकसित देश बनविण्याच्या दिशेने सरकार काम करत असल्याचा दावा त्यांनी केला. महाराष्ट्रातही मोठ्या प्रमाणावर उद्योग आणि गुंतवणूक येत असल्याचे सांगत राज्याच्या औद्योगिक विकासात मराठवाड्याची भूमिका महत्त्वाची राहणार असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**'सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन करणारे निर्णय'**

राज्य सरकारने सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे अनेक निर्णय घेतल्याचा दावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला. शेतकऱ्यांना कर्जमाफी, शेतीपंपांच्या वीजबिलासंदर्भातील निर्णय तसेच दिवसा वीजपुरवठा यांचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

राज्यातील ७६ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या जुन्या वीजबिलांबाबतही सरकार मोठा निर्णय घेणार असल्याचे सांगताना तब्बल ५५ हजार कोटी रुपयांची वीजबिल माफी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

**'लाडकी बहीण योजना बंद होणार नाही'**

महिलांसाठीच्या *(पान २ वर)*

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यापूर्वी हिंदू महासभेचे धनसिंह सूर्यवंशी, ॲड. बिल्होरे स्थानबद्ध

पंढरपूर कॉरिडॉर विरोध व जालना नामांतराच्या मागणीच्या अनुषंगाने पोलिसांकडून कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुक्रवार दि. १४ ऑगस्टच्या जालना दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, पोलिसांकडून खबरदारीचा उपाय म्हणून अखिल भारत हिंदू महासभेचे प्रदेश संगठन मंत्री धनसिंह सूर्यवंशी आणि देवगिरि प्रांत प्रमुख ॲड. ईश्वर बिल्होरे यांना पोलिसांनी स्थानबद्ध केले आहे. मुख्यमंत्री जालना दौऱ्यावर येत असताना हिंदू महासभेद्वारे विविध मागण्यांसाठी आंदोलन



छेडण्यात येणार होते, मात्र त्यापूर्वीच पोलिसांनी ही स्थानबद्धतेची कारवाई केली.

अखिल भारत हिंदू महासभेद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर काही मागण्या मांडण्यात येणार होत्या. त्यांना भेटून निवेदन द्यावयाचे होते मात्र तत्पूर्वीच आम्हाला *(पान २ वर)*

## मोतीगव्हाण मधील बोगस कामाची थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**जालना - प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील मोतीगव्हाणमधील बोगस रस्त्याचे कामे दाखवून परस्पर बिले उचलणाऱ्या कंत्राटदारांना जालना जिल्हा प्रशासनातील अधिकारीच पाठीशी घालत असल्याबाबतची तक्रार माजी सरपंच रमेश मोहिते यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.



आज ( दि. १४) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जालना शहरात आले होते.रमेश मोहिते यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांचे ओसडी राजेंद्र साबळे यांची भेट *(पान २ वर)*



जालना शहर महानगरपालिकेतर्फे जीएसटी अनुदानात मध्ये वाढ करून मिळावी या संदर्भात मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. व सत्कार करण्यात आला यावेळी महापौर वंदना मगरे उपमहापौर राजेश राऊत सभापती अशोक पांगारकर भास्कर आबा दानवे कैलास गोरंट्याल व इतर

**छायाचित्र किरण खानापुरे**

### रेशीम उत्पादनाचा जालनाई ब्रँड लाँच

# सीड आणि स्टीलची सिटी नंतर आता सिल्क सिटी म्हणून जालना जिल्हा ओळखला जाणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

*जालन्यातील रेशीम बाजारपेठेचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन*

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्याची ओळख आता 'सिल्क, सीड आणि स्टील' अर्थात 'ट्रिपल एस सिटी' म्हणून निर्माण झाली असून, रेशीम उद्योगाच्या माध्यमातून जिल्ह्यात नव्या अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. कापूस आणि सोयाबीन या पारंपरिक नगदी पिकांना पर्याय म्हणून रेशीम शेतीला प्रोत्साहन देतानाच उत्पादनापासून प्रक्रिया, वस्त्रनिर्मिती, ब्रँडिंग आणि बाजारपेठेपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी जालन्यात विकसित करण्यावर शासनाचा भर आहे. यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही अधिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होऊन जालना देशातील महत्त्वाचे रेशीम केंद्र म्हणून पुढे येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



जालना येथे नव्याने उभारण्यात आलेल्या रेशीम बाजारपेठेच्या नवीन इमारत लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन तथा पालकमंत्री पंकजा मुंडे, वस्त्रोद्योग राज्यमंत्री संजय सावकारे, लोकसभा सदस्य कल्याण काळे, जालना महानगर पालिकेच्या महापौर वंदना मगरे, यांच्यासह लोकप्रतिनिधी, तसेच वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव शैला ए., छत्रपती संभाजीनगर, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, रेशीम संचालनालय संचालक नागपूर विनय मुन, पोलीस महानिरीक्षक विरेंद्र कुमार मिश्र, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारिया, महानगरपालिका आयुक्त अंजली शर्मा, पोलीस अधिक्षक तेघबीरसिंग संधु यांची उपस्थिती होती.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, जालन्याला 'सिल्क सिटी' करण्याच्या दिशेने जिल्हा प्रशासनाने केलेले नियोजन कौतुकास्पद आहे. रेशीम उद्योगातून मोठ्या प्रमाणात अर्थव्यवस्था निर्माण होण्याची क्षमता आहे. नव्याने सुरू झालेल्या रेशीम बाजारपेठेमुळे उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या मालासाठी थेट बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. पहिल्या लिलावाला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक असून शेतकऱ्यांच्या *(पान २ वर)*

## स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रातील ४९ अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदके

**मुंबई । प्रतिनिधी**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला महाराष्ट्रातील पोलीस, अग्निशमन, होमगार्ड व नागरी संरक्षण तसेच सुधारगृह सेवेत उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने १४ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर केलेल्या राष्ट्रपती पदकांच्या यादीत महाराष्ट्रातील एकूण ४९ अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवड करण्यात आली आहे. देशाच्या अंतर्गत सुरक्षेपासून आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या जीविताचे रक्षण, कायदा-सुव्यवस्था, सुधारगृह व्यवस्थापन आणि विविध शासकीय जबाबदाऱ्या पार पाडताना केलेल्या उल्लेखनीय सेवेची दखल घेत या अधिकारी-कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदक आणि राष्ट्रपती गुणवत्तापूर्ण सेवा पदक या दोन प्रकारच्या पदकांचा समावेश आहे. विशिष्ट सेवेसाठी महाराष्ट्रातील ५ जणांचा सन्मान राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदकासाठी महाराष्ट्रातील पाच अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवड झाली आहे. यामध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील तीन अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक शिरीष रविंद्र जैन, पोलीस उपअधीक्षक सुभाष नानासाहेब भुजंग आणि सहायक *(पान २ वर)*

# संपादकीय...

## गुटखा पकडला; पण खरा प्रश्न मालाचा नाही, 'नेटवर्क'चा आहे!

भोकरदनमध्ये पोलिसांनी प्रतिबंधित सुगंधित पानमसाला आणि जाफरानी जर्दाचा मोठा साठा पकडून वाहनासह ६१ लाख ५६ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सिल्लोडकडून भोकरदनकडे येणाऱ्या आयशर वाहनावर सापळा रचून करण्यात आलेली ही कारवाई निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र या कारवाईकडे केवळ '६१ लाखांचा गुटखा पकडला' एवढ्या एका आकड्यातून पाहणे चुकीचे ठरेल. कारण खरा प्रश्न असा आहे इतक्या मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित माल तयार करणारा कोण? तो कुठून निघाला? कोणाच्या सांगण्यावरून पाठवला गेला? भोकरदनमध्ये कोणासाठी येत होता? आणि यापूर्वी अशाच किती खेपा या मार्गाने पोहोचल्या आहेत?

या प्रश्नांची उत्तरे मिळाली तरच या कारवाईला खऱ्या अर्थाने 'नेटवर्कवर घाव' असे म्हणता येईल.

६१ लाखांचा माल म्हणजे किरकोळ व्यवहार नव्हे

पोलिसांच्या माहितीनुसार, कारवाईत सुमारे २१.९३ लाख रुपयांचा सुगंधित पानमसाला आणि १४.६२ लाख रुपयांचा जाफरानी जर्दा जप्त करण्यात आला. याशिवाय सुमारे २५ लाख रुपये किमतीचे आयशर वाहनही ताब्यात घेण्यात आले.

इतक्या मोठ्या मूल्याचा माल एखाद्या व्यक्तीने केवळ वैयक्तिक वापरासाठी किंवा किरकोळ विक्रीसाठी आणला असे मानणे अवघड आहे. त्यामागे पुरवठा, वितरण आणि विक्रीची काही ना काही साखळी असण्याची शक्यता तपासणे स्वाभाविक आहे. म्हणूनच जप्ती हा तपासाचा शेवट नसून सुरुवात आहे.

आयशर पकडला; आता 'माल कुणाचा?' हा प्रश्न महत्त्वाचा वाहनचालक पोलिसांच्या हाती लागला. प्राथमिक चौकशीत हा माल भोकरदन येथील व्यक्तीला पुरविण्यासाठी आणला जात असल्याचे त्याने सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

मात्र तपासाची खरी दिशा इथून पुढे ठरते.

वाहनचालक हा या संपूर्ण व्यवहारातील प्रमुख व्यक्ती आहे की केवळ वाहतूक करणारा घटक? मालाची खरेदी कोणी केली? पैसे कोणी दिले? माल पाठविणाऱ्याशी संपर्क कोणाचा होता? मोबाईल कॉल, संदेश, आर्थिक व्यवहार आणि वाहनाच्या प्रवासाची माहिती काय सांगते? या डिजिटल आणि आर्थिक धाग्यांचा तपास झाला तरच पुरवठा साखळीपर्यंत पोहोचणे शक्य आहे. 'एक खेप' की नियमित पुरवठा?

या कारवाईतील सर्वात गंभीर प्रश्न म्हणजे हा माल भोकरदनमध्ये पहिल्यांदाच येत होता का?

जर इतक्या मोठ्या प्रमाणात माल एका खेपेत येत असेल, तर त्यापूर्वी अशाच खेपा झाल्या आहेत का, याचाही तपास आवश्यक आहे. वाहनाचा मार्ग, मागील प्रवास, टोल नोंदी, सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन, चालकाचे संपर्क आणि आर्थिक व्यवहार तपासल्यास यापूर्वीच्या हालचालींचे धागेदोरे मिळू शकतात. एक आयशर पकडणे सोपे; पण त्यामागची वाहतूक साखळी उघड करणे हे पोलिसांच्या तपासकौशल्याचे खरे आव्हान आहे. स्थानिक बाजारपेठेपर्यंत पोहोचणारा माल कुठे जातो? भोकरदनकडे माल येत होता, अशी माहिती पोलिसांच्या कारवाईतून समोर आली आहे. त्यामुळे पुढचा प्रश्न स्थानिक वितरणाचा आहे. हा माल एखाद्या व्यक्तीकडेच जाणार होता की पुढे अनेक किरकोळ विक्रेत्यांपर्यंत पोहोचणार होता? शहराबरोबरच ग्रामीण भागातही त्याचे वितरण होणार होते का? अशा मालाची विक्री करणारी दुकाने, गोडाऊन किंवा मध्यस्थ यंत्रणा अस्तित्वात आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यास जप्तीपेक्षा मोठे यश म्हणजे स्थानिक वितरणाचे जाळे उद्ध्वस्त करणे ठरेल. आरोग्याचा प्रश्न केवळ पोलिसांचा नाही गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांवरील बंदीचा उद्देश केवळ कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई करणे नाही. त्यामागे सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न आहे. विशेषतः तरुणांमध्ये तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसन वाढत असेल, तर त्याचा परिणाम पुढे आरोग्यव्यवस्थेवर होतो. त्यामुळे अशा मालाचा पुरवठा रोखणे ही पोलिसांची जबाबदारी असली, तरी विक्रीची साखळी तोडण्यासाठी अन्न व औषध प्रशासन, स्थानिक प्रशासन आणि इतर संबंधित यंत्रणांमध्येही समन्वय आवश्यक आहे. माल पकडला आणि प्रकरण संपले, अशी भूमिका घेतली तर मूळ समस्या कायम राहते. जप्तीची संख्या नव्हे, 'पुनरावृत्ती थांबली का?' हे महत्त्वाचे अवैध गुटखा-पानमसाला प्रकरणात मोठ्या प्रमाणात माल पकडल्याची बातमी प्रसिद्ध होते. काही दिवसांनी पुन्हा दुसऱ्या ठिकाणी तसाच साठा सापडतो. मग प्रश्न निर्माण होतोकारवाई होत असूनही पुरवठा सुरू कसा राहतो? याचे उत्तर केवळ पोलिसांच्या कारवाईत नाही. मागणी कायम असेल तर पुरवठादार नवीन मार्ग शोधतात. त्यामुळे पुरवठा करणारा, वाहतूक करणारा, साठवणूक करणारा आणि विक्री करणारा अशा प्रत्येक स्तरावर कारवाई होणे आवश्यक आहे. 'मोठी कारवाई' ते 'मोठा तपास'! भोकरदन पोलिसांनी केलेली कारवाई ही निश्चितच महत्त्वाची आहे. मात्र तिचे पुढील यश न्यायालयात दोषसिद्धी आणि नेटवर्कच्या उघडकीवर अवलंबून असेल. जप्त मालाचे नमुने, पंचनामा, वाहनाची कागदपत्रे, आरोपींचे मोबाईल, आर्थिक व्यवहार, मालाचा स्रोत आणि संभाव्य ग्राहक यांचा तपास किती सखोल होतो, हे महत्त्वाचे आहे. पोलिसांनी या प्रकरणात पुरवठादार आणि स्थानिक वितरण साखळीपर्यंत पोहोचले, तर ६१ लाखांच्या जप्तीपेक्षा त्याचे महत्त्व कितीतरी मोठे असेल. प्रशासनानेही स्वतःला काही प्रश्न विचारण्याची वेळ

एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित माल बाजारात पोहोचण्यापूर्वी कोणत्याही यंत्रणेच्या लक्षात येत नाही का? वाहतूक मार्गावर अशा वाहनांची तपासणी कशी होते? शहरात माल पोहोचल्यानंतर तो कोणत्या माध्यमातून किरकोळ विक्रेत्यांपर्यंत जातो? हे प्रश्न केवळ एका कारवाईपुरते नाहीत. अवैध व्यापाराविरुद्ध प्रभावी यंत्रणा उभी करायची असेल तर 'इंटेलिजन्स' मजबूत करणे, विभागांमध्ये माहितीची देवाणघेवाण करणे आणि नियमितपणे पुरवठा साखळीचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. पुढील कारवाईच या यशाची खरी परीक्षा भोकरदन पोलिसांच्या या कारवाईचे स्वागत केलेच पाहिजे. परंतु आता जनतेची अपेक्षा त्यापुढची आहे.

माल कुठून आला? कोणाने पाठवला? कोणासाठी आला? यापूर्वी किती खेपा झाल्या? या मालाचे पुढे कोण वितरण करणार होते? आणि या व्यवहारामागे आणखी कोण आहेत? या प्रश्नांची उत्तरे तपासातून बाहेर आली तरच ६१ लाखांची ही कारवाई एक मोठा धक्का ठरेल.

पान ४ वरुन...

### मराठवाड्याला दुष्काळमुक्त...

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेबाबतही फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली. ही योजना बंद होणार नसून लाडक्या बहिणींना पैसे देत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील एक कोटी महिलांना भविष्यात 'लखपती दीदी' बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सरकार विविध माध्यमातून प्रयत्न करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**'निवडणूक नसतानाही ३६ हजार कोटींची कर्जमाफी'**

शेतकरी कर्जमाफीवर बोलताना फडणवीस यांनी विरोधकांवरही निशाणा साधला. कुठलीही निवडणूक नसताना सरकारने आपले वचन पूर्ण करण्यासाठी ३६ हजार कोटी रुपयांची कर्जमाफी दिल्याचे त्यांनी सांगितले.

''उद्धव ठाकरेंच्या कर्जमाफीसारखी आम्ही कर्जमाफी केली नाही. आम्ही विनाअट दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली,'' असा दावा फडणवीस यांनी केला.

**'मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू देणार नाही'**

मराठवाड्याच्या पाणीप्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोठे आश्वासन दिले. मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्याचा सरकारचा संकल्प असून, पश्चिमवाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी मराठवाड्याकडे आणण्याच्या दिशेने सरकार काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

''मराठवाड्याच्या पुढच्या पिढीला आम्ही दुष्काळ पाहू देणार नाही,'' असे फडणवीस म्हणाले. पाण्याच्या उपलब्धतेत वाढ झाली तर शेती, उद्योग आणि रोजगाराच्या संधींमध्ये मोठी वाढ होऊ शकते. त्यामुळे मराठवाड्याच्या दीर्घकालीन विकासासाठी जलव्यवस्थापनाला प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांच्या भाषणातून स्पष्ट झाले.

**'छत्रपती संभाजीनगर-जालना महाराष्ट्राच्या इंडस्ट्रीचे मॅग्नेट'**

औद्योगिक विकासाचा मुद्दा मांडताना फडणवीस यांनी छत्रपती संभाजीनगर आणि जालना परिसराकडे विशेष लक्ष वेधले. महाराष्ट्राच्या उद्योगविश्वात छत्रपती संभाजीनगर आणि जालना हे महत्त्वाचे औद्योगिक केंद्र राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यात आधीपासून असलेला स्टील उद्योग, बी-बियाणे उद्योग आणि रेशीम व्यवसाय या तिन्ही क्षेत्रांचा विस्तार करून त्यांना जिल्ह्याच्या आर्थिक ओळखीचा आधार बनविण्याचा प्रयत्न सरकार करणार असल्याचे संकेत त्यांनी दिले.

त्यामुळे आगामी काळात 'स्टील, सिड आणि सिल्क' अर्थात 'ट्रिपल एस' ही जालन्याची नवी ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**जालना जिल्ह्याच्या विकासात कमतरता पडू देणार नाही**

जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सरकारकडून आवश्यक ती मदत केली जाईल, अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली. उद्योग, शेती, पाणी, रोजगार आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून जालन्याला राज्याच्या विकासाच्या मुख्य प्रवाहात अधिक सक्षमपणे आणण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, भाजप जिल्हा कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमामुळे जालना शहरात भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. पक्षाच्या आगामी संघटनात्मक विस्तारासाठी हे कार्यालय महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

कार्यक्रमास भाजपचे पदाधिकारी, विविध आघाड्यांचे प्रमुख, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यापूर्वी...

स्थानबद्ध करण्यात आल्याचे प्रसार माध्यमांशी बोलताना सांगून धनसिंह सूर्यवंशी म्हणाले की, स्थानबद्धतेदरम्यान आम्ही उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन दिले. पंढरपूर ही महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असून, कॅरीडोर आराखडा या गोंडस विकासाच्या नावाखाली तिथली ऐतिहासिक ओळख, पुरातन वास्तू, मठ-मंदीरे, वाडे आणि स्थानिकांची घरे उध्वस्त केली जात आहे. हा आराखडा स्थगित करून स्थानिक नागरिक, वारकरी व भाविकांच्या सहभागातून सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करावा, अशी आमची प्रमुख मागणी आहे. प्रभू रामचंद्र व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ऐतिहासिक जालना शहराचे नाव बदलून जनकपूर करण्यात यावे, अशी जालनाकरांची अनेक वर्षांपासूनची मागणी पुन्हा एकदा लावून धरली आहे. यापुढेही या मागण्यावर आम्ही ठाम राहणार आहोत. आमचे कोणतेही हिंसक किंवा बेकायदेशीर आंदोलन नव्हते. आम्ही केवळ शांततापूर्ण मार्गाने निवेदन देण्यासाठी जाणार होतो. पंढरपूरची सांस्कृतिक परंपरा नष्ट करून तिथे केवळ पर्यटन स्थळ बनवण्याचा घाट घातला जात आहे, ज्याचा आमचा विरोध आहे. तसेच जालना शहराच्या नामांतराबाबत आणि पंढरपूर कॉरिडॉरच्या मुद्द्यावर प्रशासनाने आमचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला आहे. मुख्यमंत्र्यांनी आमच्या या मागण्यांचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी धनसिंह सूर्यवंशी यांनी केली. स्थानबद्धतेदरम्यान हिंदू महासभेच्यावतीने उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप व तालुका पोलीस ठाण्याचे रामप्रसाद रंगे यांनी हे निवेदन स्विकारले. यावेळी महाराणा ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सुखलालसिंह राजपूत व हिन्दू युवक सभेचे कार्तिक मदन उपस्थित होते.

### मोतीगव्हाण मधील...

घेऊन त्यांच्या हस्ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले.या निवेदनात मोहिते यांनी म्हटले आहे की, जालना तालुक्यातील मोतीगव्हाण येथे झालेल्या बोगस कामाबाबत जिल्हा प्रशासनास दिलेल्या तक्रारीमध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत ४ रस्त्याचे ४० लक्ष रुपये, संरक्षण भिंतीसाठी ७ लक्ष रुपये, एलईडी लाईट बसवण्यासाठी १० लक्ष रुपये तसेच दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत स्मशानभूमी शेड बांधकाम ३ लक्ष ५० हजार व आरो फिल्टर साठी २० लक्ष रुपये असा जवळपास ८० लक्ष रुपयाचा विकास निधी परस्पर उचलले असल्याचे दिसून आले आहे. या गैरप्रकाराची निष्पक्ष चौकशी झाल्यास आणखी गैरव्यवहार उघडकीस येतील. विविध विकास कामाच्या नावाखाली रस्ते व इतर कामे न करता ठेकेदारांनी प्रशासनातील काही अधिकारी, कर्मचारी यांच्याशी आर्थिक संबंध ठेवून सरकारी निधीचा गैरवापर करून जनतेच्या पैशावर लाखो रुपयांचा डल्ला मारलेला आहे. अशा ठेकेदारांच्या रीतसर तक्रारी जिल्हा प्रशासनास देऊन सुद्धा त्यांची चौकशी होत नाही किंवा त्यांच्यावर कुठल्याही प्रकारे गुन्ह्याची नोंद होत नाही, अशा प्रवृत्तींना इथले प्रशासन पाठबळ देऊन पाठीशी घालत आहेत. अशा प्रकारे शासन निधीचा गैरवापर होत असेल तर नागरिकांना सुविधा कशा मिळणार. हे फक्त आमच्याच गावात झाले असे नाही, तर असे अनेक गावे यांनी कमाईचे अड्डे बनवून ठेवलेले आहेत. त्यामुळे दोषींवर कारवाई होणे गरजेचे आहे. अशा प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार यांच्याकडून शासनाचा निधी परत घेऊन संबंधितावर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी व गावातील विकास कामे करावीत, अशी मागणीही मोहिते यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओसडी राजेंद्र साबळे यांनी या प्रकरणी आठ दिवसात कारवाई करण्याबाबतचे आश्वासन मोहिते यांना दिले. जालना दौऱ्यावर आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घडवून न आणल्यास १५ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डफडी बजाव आंदोलनात करू, असा इशाराही मोहिते यांनी दिला होता.

### रेशीम उत्पादनाचा...

उत्पादनाला अधिकाधिक चांगला दर मिळावा, यासाठी व्यापारी आणि संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

मागील अनेक वर्षांपासून शेतकरी कापूस आणि सोयाबीन या प्रमुख नगदी पिकांवर अवलंबून आहेत. या पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी शेतकऱ्यांना पर्यायी नगदी पिकांचा पर्याय देणे आवश्यक आहे. रेशीम शेती हा त्यासाठी अत्यंत चांगला पर्याय असून, अल्पभूधारक शेतकऱ्यांनाही यातून चांगले उत्पन्न मिळविण्याची संधी आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळविण्यासाठी प्रशिक्षण आणि तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

केवळ रेशीम उत्पादन करून उपयोग नाही, तर त्यापुढील प्रक्रिया, धागानिर्मिती, वस्त्रनिर्मिती, साडी विणकाम, ब्रँडिंग आणि बाजारपेठ अशी संपूर्ण मूल्यसाखळी उभारणे महत्त्वाचे आहे. जालन्यात या दिशेने विविध प्रयोग सुरू आहेत. स्थानिक पातळीवर रेशीम वस्त्रनिर्मितीला चालना मिळाल्यास शेतकरी, महिला, विणकर, व्यापारी आणि युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील, असे मुख्यमंत्री म्हणाले.

जालन्यातील महिलांनी रेशीमपासून साडी विणकाम सुरू केले असून त्यांचे कौशल्य आणि तयार होणाऱ्या वस्त्रांची गुणवत्ता उल्लेखनीय आहे. या महिलांना अधिक प्रशिक्षण, कौशल्यविकास आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास रेशीम वस्त्रनिर्मितीला मोठी चालना मिळू शकते. पैठणीला जशी स्वतंत्र ओळख मिळाली, त्याच धर्तीवर पालकमंत्री पकंजा मुंडे यांनी सुचविल्यानुसार जालन्यात तयार होणाऱ्या सिल्कच्या उत्पादनांना जालनाई या स्वतंत्र ब्रँडने ओळखले जाईल अशी घोषणा करुन, 'जालनाई' ब्रॅन्ड लोगोचे विमोचन केले.

ज्याप्रमाणे पैठणी साडी जगप्रसिद्ध आहे, त्याच धर्तीवर स्थानिक महिलांच्या कौशल्याच्या जोरावर जालना सिल्क ला देखील आंतरराष्ट्रीय स्तरावर एक मोठा ब्रँड म्हणून विकसित केले जाईल असे त्यांनी सांगितले.

जालना येथे ड्रायपोर्ट सुरू झाल्यामुळे रेशीम उत्पादनाला देशांतर्गत बाजारपेठे बरोबरच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. एकेकाळी भारत जगाला रेशीम निर्यात करणारा देश होता. आता पुन्हा भारताने जागतिक रेशीम बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जालना येथील रेशीम बाजारपेठ आणि ड्रायपोर्ट या दृष्टीने महत्त्वाची पायाभूत सुविधा ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

रेशीम उद्योगाचा विस्तार करण्यासाठी अधिकाधिक शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. रेशीम उत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान, प्रक्रिया, गुणवत्ता, बाजारपेठ आणि मूल्यवर्धन याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी डिजिटल माध्यमांचा वापर करावा. कौशल्यविकासाच्या माध्यमातून शेतकरी आणि महिलांना या संपूर्ण मूल्यसाखळीत सहभागी करून घेण्यावर आगामी काळात भर दिला जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रभावी तपास आणि जलद न्यायप्रक्रिया आवश्यक असून, अलीकडील एका गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी अल्पावधीत आरोपपत्र दाखल करून न्यायालयीन प्रक्रिया गतिमान केल्याबद्दल त्यांनी संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. गुन्हेगारांवर कायद्याचा वचक निर्माण होण्यासाठी अशा प्रकारची जलद आणि प्रभावी कार्यवाही आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रारंभी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जालना जिल्ह्यातील रेशीम शेती व उद्योगातील संधीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती सादर केली.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत रेशीम उत्पादक शेतकरी आणि रेशीम खरेदी करणारे व्यापारी यांच्यातला पहिला रेशीम कोष लिलाव करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या हस्ते घंटानाद करून पहिला रेशीम कोष लिलाव प्रक्रिया संपन्न झाली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी घनसावंगी तालुक्यातील शेतकरी श्री. भागवत पंडीतराव भानुसे आणि श्री. भाऊसाहेब दत्ता निवदे यांचा सपत्नीक सत्कार केला. तसेच गंभीर गुन्ह्यात पोलिसांनी अल्पावधीत आरोपपत्र दाखल करून न्यायालयीन प्रक्रिया गतिमान राबविल्याबद्दल सरकारी वकील श्रीमती मुकीम यांचा सत्कार केला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते अंबड येथील नविन पोलिस स्टेशन इमारत आणि जिल्हा परिषद जालना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्राथमिक आरोग्य केंद्र रांजणी, राणी उंचेगाव, पिंपरखेड बु., दुधना काळेगाव, हसनाबाद, शहागड, वाकुळणी या सात नविन इमारतीचे ऑनलाइन लोकार्पण करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमास अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, उपसंचालक महेंद्र ढवळे, रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता डी.एन. कोल्हे, जिल्हा रेशीम अधिकारी वाखारे, रेशीम विकास अधिाकरी शंकर बराट, शेतकरी, व्यापारी यांच्यासह विविध विभागातील अधिकारी कर्मचारी आणि नागरिकांची उपस्थिती होती.

### स्वातंत्र्यदिनाच्या...

पोलीस उपनिरीक्षक संजय राजाराम व्हायचळे यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे.

याशिवाय सुधारगृह सेवेत कार्यरत संजिव सखाराम घणेकर, सबेदार आणि संजय राजारामजी तळवारे, हवालदार यांचीही राष्ट्रपती विशिष्ट सेवा पदकासाठी निवड करण्यात आली आहे.

दीर्घकाळ सातत्यपूर्ण, जबाबदारीपूर्ण आणि विशेष उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना या श्रेणीतील पदक प्रदान केले जाते. त्यामुळे महाराष्ट्रातील या पाच जणांची निवड त्यांच्या सेवाकार्याचा विशेष गौरव मानली जात आहे.

गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ४४ अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवड राष्ट्रपती गुणवत्तापूर्ण सेवा पदकासाठी महाराष्ट्रातील तब्बल ४४ अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवड झाली आहे. यामध्ये विविध विभागांतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र पोलीस दलातील ३७ अधिकारी-कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. पोलीस महासंचालक स्तरापासून ते हेड कॉन्स्टेबल पदापर्यंतच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा या यादीत समावेश असल्याने पोलीस दलातील विविध स्तरांवर बजावलेल्या गुणवत्तापूर्ण सेवेची दखल घेण्यात आल्याचे स्पष्ट होते. पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून कायदा-सुव्यवस्था राखणे, गुन्ह्यांचा तपास, नागरिकांची सुरक्षा, आपत्कालीन परिस्थितीत तातडीची कारवाई तसेच विविध संवेदनशील जबाबदाऱ्या पार पाडल्या जातात. अशा सेवेत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा राष्ट्रपती पदकाने गौरव करण्यात येणार आहे.

**अग्निशमन सेवेतही दोन जणांचा गौरव**

महाराष्ट्र अग्निशमन सेवेतून मुख्य अग्निशमन अधिकारी शंकर उत्तम मिसाळ आणि फायरमन शैलेश महादेव जगताप यांची गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदकासाठी निवड करण्यात आली आहे.

आगीच्या घटना, अपघात, नैसर्गिक आपत्ती तसेच इतर आपत्कालीन परिस्थितींमध्ये स्वतःचा जीव धोक्यात घालून नागरिकांचे प्राण व मालमत्ता वाचविण्याचे काम अग्निशमन दलाकडून केले जाते. या पार्श्वभूमीवर अग्निशमन सेवेतील दोन कर्मचाऱ्यांचा राष्ट्रीय स्तरावरील सन्मान विशेष महत्त्वाचा ठरला आहे.

**होमगार्ड व नागरी संरक्षण विभागातील तीन जणांचाही सन्मान**

होमगार्ड व नागरी संरक्षण विभागातील पोपट रामजी सांगडे, अशोक नामदेव इंगळे आणि मनोज सदाशिव बारसागडे यांचीही गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदकासाठी निवड करण्यात आली आहे.

आपत्कालीन परिस्थिती, सार्वजनिक सुरक्षा आणि प्रशासनाला आवश्यक त्या वेळी मदत करण्यामध्ये होमगार्ड व नागरी संरक्षण यंत्रणेची महत्त्वाची भूमिका असते. या विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवेला केंद्र सरकारने राष्ट्रपती पदकाच्या माध्यमातून गौरविले आहे.

**सुधारगृह सेवेत दोन कर्मचाऱ्यांचा गौरव**

सुधारगृह सेवेतून विकास हनमंतु राजनलवार, अधीक्षक ग्रुप-ब आणि महेश लक्ष्मण गडनाईक, हवालदार यांची गुणवत्तापूर्ण सेवेसाठी निवड करण्यात आली आहे.

सुधारगृह व्यवस्थेत बंदीवानांची सुरक्षितता, शिस्त, प्रशासन आणि विविध सुधारात्मक उपक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर असते. या क्षेत्रातील उल्लेखनीय सेवेलाही राष्ट्रपती पदकाच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे.

**१४ ऑगस्टला पदकांची घोषणा**

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आदेशानुसार राष्ट्रपती पदकांची घोषणा १४ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आली. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला दरवर्षी देशभरातील विविध सुरक्षा व आपत्कालीन सेवांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची परंपरा आहे. या वर्षीच्या घोषणेत महाराष्ट्रातील ४९ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश झाला आहे. संबंधित पुरस्कारांची अधिसूचना भारत सरकारच्या संकेतस्थळावर उपलब्ध होणार असून, या पुरस्कारांची नोंद भारताच्या राजपत्रात करण्यात येणार आहे.

**विविध सेवांतील योगदानाला राष्ट्रीय मान्यता**

महाराष्ट्रातील ४९ अधिकारी-कर्मचाऱ्यांची राष्ट्रपती पदकासाठी झालेली निवड ही केवळ संबंधित व्यक्तींचाच नव्हे, तर त्यांच्या विभागाचाही गौरव मानला जात आहे.

पोलीस दलातील ४० अधिकारी-कर्मचाऱ्यांचा या यादीतील समावेश विशेष उल्लेखनीय आहे. त्याचबरोबर अग्निशमन, होमगार्ड व नागरी संरक्षण आणि सुधारगृह सेवेत काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही या सन्मानात स्थान मिळाले आहे.

कायद्याची अंमलबजावणी, नागरिकांची सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि सार्वजनिक सेवांमध्ये सातत्याने काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना राष्ट्रपती पदकाने सन्मानित केले जाणार आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर जाहीर झालेला हा सन्मान महाराष्ट्रातील संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.

### आंतरराष्ट्रीय युवा...

डॉ. एस. एल. मेढे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. युवकांनी देशाच्या विकासात सक्रिय सहभाग घेऊन राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात योगदान द्यावे, तसेच राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक बांधिलकी आणि देशप्रेमाची भावना जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. पी. जगतवाड, प्रा. डॉ. प्रदीप मिसाळ, प्रा. डॉ. सारिका जाधव, प्रा. सरिता मणियार आणि प्रा. ए. आर. वैद्य यांनी परिश्रम घेतले. रॅलीची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

### सौ. वर्षा पित्ती यांना...

क्लब, ए के एस आणि रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ जालना ज्युनियर्स प्रायोजित केल्याबद्दल विशेष सन्मान, डिस्ट्रिक्ट एन्डोवमेंट / मेजर गिफ्टसाठी विशेष प्रशंसा पुरस्कार, ॲन्यूअल फंड ५०:५० माईलस्टोन पुरस्कार, पीस बिल्डर क्लब सन्मान या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. जालना रोटरी क्लबला मिळालेल्या या बहुमानाबद्दल बोलताना सौ. वर्षा पित्ती म्हणाल्या की, हा बहुमान एकट्या माझा नसून, जालना रोटरी क्लबच्या संपूर्ण टीमच्या निस्वार्थ सेवाभावाचा आणि परिश्रमाचा आहे. रोटरीच्या माध्यमातून समाजसेवेची मिळालेली ही संधी आमच्यासाठी अमूल्य असून, या यशाने आम्हाला भविष्यात आणखी जोमाने आणि प्रभावीपणे लोककल्याणकारी उपक्रम राबवण्याची नवी ऊर्जा व प्रेरणा दिली आहे, याप्रसंगी जालना येथून ज्येष्ठ रोटरीयन अरुण अग्रवाल, रमेश मगरे, प्रमोद झांजरी, राजेश सोनी, महेंद्र बागड़ी, माजी सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, डॉ. दीपक बगडिया, डॉ विजय जेथलीया, मनोज पित्ती, राजेश बजाज, सोनी बजाज, सुनिती मदन, चिराग़ तलरेजा , अभिषेक बिन्नीवाले क्लबचे नूतन अध्यक्ष प्रशांत महाजन, सचिव संदीप मुंदडा, जितेंद्र अग्रवाल, सरला अग्रवाल, अर्चना देशपांडे , रवि भक्कड़ आदींची उपस्थिती होती.

### व्ही. एस. एस...

संशोधन, माहितीशास्त्र तसेच बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर ग्रंथपालाची बदलती भूमिका याविषयी मार्गदर्शन केले. तसेच एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता)चा शैक्षणिक क्षेत्रात प्रभावीपणे कसा वापर करता येईल आणि त्याचा वापर करताना कोणती दक्षता घ्यावी, याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात राष्ट्रीय ग्रंथपाल दिनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

# २१ ऑगस्टला जलसंधारण दिनानिमित्त आयोजित 'महा वॉकेथॉन'मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा

## मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांचे आवाहन

**मुंबई - प्रतिनिधी**

येत्या २१ ऑगस्ट रोजी संपूर्ण महाराष्ट्रात ''जलसंधारण दिन'' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, मुंबईतील राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमासह सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी 'महा वॉकेथॉन २०२६ वॉक फॉर वॉटर' चे आयोजन करण्यात आले आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते या स्पर्धेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी या दोन्ही उपक्रमांमध्ये राज्यातील युवक-युवती आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मंत्री संजय राठोड यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या जलसंधारण क्षेत्राला दूरदृष्टी आणि व्यापक दिशा देणारे माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त २१ ऑगस्ट हा दिवस 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्यात येत असून, त्यांच्या जलसंधारणविषयक योगदानाचे स्मरण करत राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यावर्षीच्या जलसंधारण दिनाचा मुख्य संदेश ''माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा'' असा आहे.

**१५ ऑगस्टपासून 'जलसंधारण सप्ताह'**

१५ ऑगस्टपासून राज्यात 'जलसंधारण सप्ताह' सुरू होणार असून, २१ ऑगस्टपर्यंत शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, स्थानिक स्वराज्य संस्था आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून मृद व जलसंधारण, पाणी बचत, भूजल पुनर्भरण, पावसाच्या पाण्याचे संकलन तसेच नदी-ओढ्यांच्या स्वच्छतेसंदर्भात विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

जलसंधारण सप्ताहानंतरही या उपक्रमांमध्ये सातत्य राखत 'जलसंधारण अभियान' म्हणून २६ जानेवारी २०२७ पर्यंत जिल्हास्तरावर विविध जनजागृती व लोकसहभागाचे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या माध्यमातून मृद व जलसंधारणाचा संदेश दीर्घकाळ जनमानसात रुजवून जलसंधारणाला व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**२१ ऑगस्टला संपूर्ण राज्यात 'महा वॉकेथॉन'**

२१ ऑगस्ट रोजी सकाळी संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी एकाच वेळी ३ कि.मी. स्पर्धात्मक 'महा वॉकेथॉन' आयोजित करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान १० हजार नागरिकांच्या सहभागाचे लक्ष्य ठेवण्यात आले असून, राज्यभरातून ३ लाखांपेक्षा अधिक नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग अपेक्षित आहे.

या उपक्रमासाठी क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र देण्यात येईल. सहभागी नागरिकांना मृद व जलसंधारणाच्या कार्याशी सातत्याने जोडण्यासाठी 'जलदूत' ही ओळख देण्याची संकल्पनाही या अभियानाचा भाग आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व सहभागी नागरिक सामूहिक मृद व जलसंधारण शपथ घेतील. पाण्याचे महत्त्व जनतेपर्यंत पोहोचविणे, माती व पाण्याच्या संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि मृद व जलसंधारणाच्या कार्यात व्यापक लोकसहभाग वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले, ''हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर माती आणि पाण्याचे संवर्धन ही काळाची गरज आहे. प्रत्येक नागरिकाने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्त्व ओळखून या महा वॉकेथॉनमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे आणि मृद व जलसंधारणाचा संदेश घराघरात पोहोचवावा.''

**विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसे**

महा वॉकेथॉनमध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांकासाठी ₹२५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी ₹१५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय क्रमांकासाठी ₹११ हजार व गौरवचिन्ह अशी प्रोत्साहनपर बक्षिसे प्रस्तावित आहेत.

तसेच सहभागी नागरिकांसाठी भाग्यवान सोडतीच्या माध्यमातून विशेष प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे नियोजन आहे. प्रायोजक अथवा सामाजिक उत्तरदायित्व निधीतून सहभाग उपलब्ध झाल्यास आणखी आकर्षक प्रोत्साहनपर बक्षिसांचा समावेश करता येणार आहे.

**युवकांसाठी 'रील फॉर सॉईल अँड वॉटर चॅलेंज'**

जलसंधारण दिनाच्या अभियानाला डिजिटल माध्यमातून व्यापक लोकचळवळीचे स्वरूप देण्यासाठी 'रील फॉर सॉईल अँड वॉटर चॅलेंज' हा विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहे. राज्यातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींसाठी ही जिल्हास्तरीय स्पर्धा असेल. सहभागी युवक-युवतींना मृद व जलसंधारणाचा संदेश देणारी ३० ते ६० सेकंदांची इन्स्टाग्राम रील तयार करता येईल. संपूर्ण राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि राज्यभरातून १० हजार रील्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रील स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार ₹२५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार ₹१५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार ₹१० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष ''युवा मृद-जलदूत'' म्हणून गौरविण्यात येणार आहे.

**शासनाची जलसंधारण कामगिरीही जनतेसमोर**

जलसंधारण सप्ताह आणि महा वॉकेथॉनच्या माध्यमातून शासनाच्या विविध मृद व जलसंधारण योजनांची माहितीही जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. यामध्ये जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार, अमृत सरोवर, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० यासह विविध मृद व जलसंधारण कामे, यशस्वी प्रकल्प आणि लाभार्थी यशोगाथांचा समावेश असेल.

**कोण कोण सहभागी होणार?**

या राज्यव्यापी उपक्रमात लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, युवक-युवती, महिला, शासकीय अधिकारी-कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), माय भारत, क्रीडा संस्था, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, उद्योग क्षेत्र, खेळाडू, कलाकार, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि सामान्य नागरिकांचा व्यापक सहभाग अपेक्षित आहे.

प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समन्वय करण्यात येणार आहे. मुंबईतील राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रमाला मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, लोकप्रतिनिधी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि कलाकारांचा सहभाग अपेक्षित आहे.

आपल्या पुढच्या पिढीसाठी माती आणि पाणी जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. महा वॉकेथॉनमध्ये सहभागी व्हा, रील स्पर्धेत सहभागी व्हा आणि मृद व जलसंधारणाचा संदेश महाराष्ट्राच्या घराघरात पोहोचवा. एक पाऊल जलसंधारणासाठी टाकूया आणि लाखो पाऊले सुरक्षित भविष्यासाठी एकत्र चालूया, असे आवाहन मंत्री संजय राठोड केले आहे.

# वाचकांचे मनोगत करिता

भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्य दिन शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी देशभरात उत्साहात साजरा केला जाईल.शासकीय, निमशासकीय इमारतींवर झेंडावंदनाचे कार्यक्रम पार पडतील, देशभक्तीची गाणी सर्वत्र ऐकू येतील.ध्वजारोहन झाल्यावर नेत्यांची भाषणे होतील,चहा-पान, लहान मुलांचे देशभक्तीवर भाषणे होतील.देशाला स्वांतत्र्य मिळावे म्हणून अनेक स्वातंत्र्यसेनानी इंग्रजांच्या काळात लढा देत स्वांतत्र्य मिळावे म्हणून प्राणांची बाजी लावली होती.मात्र, स्वातंत्र्यानंतर इंग्रज बरे होते अशी म्हणण्याची वेळ आली आहे.देशाची लोकशाही संपुष्टात आणण्याचे मनसुबे रचले जात आहेत.राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी पळवून नेले जात आहेत.राजकीय पक्षांना कोंडीत पकडून त्यांच्या आमदार, खासदार आपल्या पक्षात घेऊन त्यांना दुबळे करण्याची कारस्थाने घडवून आणली गेली आहेत.सत्ता फक्त आपल्यासाठी आहे.ती हातून जाऊ नये म्हणून कायदे, नियमावली यांची पायमल्ली केली जाते आहे.८० व्या वर्षातही ग्रामीण भागातील नागरिकांना जीवनावश्यक सेवा सुविधा उपलब्ध नाहीत.रस्ते,पाणी, शिक्षण, आरोग्य, दिवाबत्ती यांच्या समस्या कायम आहेत.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९** .

# रेल्वेतील प्रवाशांचा माल चोरीला गेल्यास रेल्वे प्रशासनच जबाबदार; ग्राहक आयोगाचा दणका, ७० हजारांची भरपाई देण्याचे आदेश!

**पठाणकोट - प्रतिनिधी**

आरक्षित डब्यात प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेची आणि त्यांच्या सामानाची पूर्ण जबाबदारी रेल्वे प्रशासनाचीच असते, असा एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ग्राहकांना दिलासा देणारा निर्णय जिल्हा ग्राहक विवाद निवारण आयोग, पठाणकोट यांनी दिला आहे. रेल्वेतील प्रवासादरम्यान पर्स चोरीला गेल्याच्या प्रकरणात आयोगाने उत्तर रेल्वेला सेवेत त्रुटी ठेवल्याबद्दल दोषी ठरवले असून, पीडित प्रवाशाला ७० हजार रुपयांची भरपाई आणि १० हजार रुपये मानसिक त्रासापोटी देण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत.

या ऐतिहासिक निर्णयाबाबत माहिती देताना ॲड. महेश एस. धन्नावत यांनी सांगितले की, ''बऱ्याचदा रेल्वेप्रवासात सामान चोरीला गेल्यास रेल्वे प्रशासन हे नियमांचे बोट दाखवून स्वतःची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करते. परंतु, राष्ट्रीय ग्राहक आयोगाचे विविध न्यायनिवाडे आणि नियमांनुसार, जर तुम्ही आरक्षित डब्याचे तिकीट काढले असेल, तर त्या डब्यात अनाधिकृत व्यक्तींना प्रवेश रोखणे, रात्रीच्या वेळी डब्याचे दरवाजे बंद ठेवणे आणि प्रवाशांच्या सामानाची काळजी घेणे ही रेल्वे कर्मचाऱ्यांची व टीटीई () यांची कायदेशीर जबाबदारी असते. जर रेल्वे कर्मचारी कर्तव्यात कसूर करत असतील, तर रेल्वे प्रशासनाला त्या नुकसानीची भरपाई द्यावीच लागते. हा निर्णय देशभरातील कोट्यवधी रेल्वे प्रवाशांचे हक्क मजबूत करणारा आणि त्यांना न्याय मिळवून देणारा ठरेल.''

**प्रकरणाची पार्श्वभूमी (केसचे तथ्य)**

या प्रकरणातील तक्रारदार काळू राम हे जीआरईएफ मध्ये कार्यरत असून ते त्यांची पत्नी सुमन यादव व मुलासह १४ डिसेंबर २०२१ रोजी राजधानी एक्सप्रेस (गाडी क्र. १२४२३) च्या ३ एसी आरक्षित डब्यातून तिनसुकिया ते नवी दिल्ली असा प्रवास करत होते. प्रवासादरम्यान पंडित दीनदयाळ उपाध्याय स्टेशनजवळ अचानक त्यांची पर्स चोरीला गेली. त्या पर्समध्ये ६५ हजार रुपये किमतीचे १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, ५ हजार रुपयांची रोख रक्कम आणि बँकेचे पासबुक होते.

**दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि घटनाक्रम**

तक्रारदारांच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, घटनेच्या वेळी डब्यात कोणताही अटेंडंट किंवा टीटीई उपस्थित नव्हता. रात्रीच्या वेळी डब्यात अनाधिकृत व्यक्तींना येण्यापासून रोखण्यात रेल्वे कर्मचारी अपयशी ठरले. चोरीची माहिती तात्काळ तेथे उपस्थित आरपीएफ कर्मचाऱ्याला देण्यात आली आणि पुढे नवी दिल्ली स्टेशनवर पोहोचताच झिरो एफआयआर दाखल करण्यात आला. प्रवाशांनी सोन्याच्या मंगळसूत्राची खरेदी पावतीसुद्धा पुराव्यादाखल सादर केली. दुसऱ्या बाजूने रेल्वे प्रशासनाने (उत्तर रेल्वे) आपले स्पष्टीकरण देताना सर्व दावे फेटाळून लावले. सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या निर्णयाचा हवाला देत रेल्वेने म्हटले की, बुक न केलेल्या सामानाच्या चोरीला रेल्वे प्रशासन जबाबदार धरले जाऊ शकत नाही. तसेच, संबंधित स्टेशन मास्तरकडे चोरीची कोणतीही माहिती नोंदवली गेली नव्हती, त्यामुळे सेवेत कोणतीही त्रुटी नाही, असा युक्तिवाद करत ही तक्रार फेटाळण्याची मागणी रेल्वेने केली.

**आयोगाचे निरीक्षण आणि निर्णय**

आयोगाचे अध्यक्ष कुलविंदर सिंग पन्नू आणि सदस्य राज कुमार शुक्ला यांनी दोन्ही बाजूंचे युक्तिवाद आणि कागदपत्रे तपासल्यानंतर रेल्वेचा दावा फेटाळून लावला. आयोगाने नमूद केले की, रेल्वेने स्वतः सादर केलेल्या कागदपत्रांवरूनच हे स्पष्ट होते की प्रवाशांनी घटनेची माहिती प्रवासादरम्यानच आरपीएफ जवानाला दिली होती. त्यामुळे ''आम्हाला माहिती नव्हती'' हा रेल्वेचा दावा पूर्णपणे खोटा ठरतो. तसेच, रात्रीच्या वेळी अटेंडंट हजर होता की नाही, याचा कोणताही पुरावा किंवा ड्युटी रजिस्टर रेल्वे सादर करू शकली नाही. आरक्षित डब्यात अनाधिकृत माणसांना प्रवेश मिळणे आणि कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात निष्काळजीपणा दाखवणे ही स्पष्टपणे सेवेतील त्रुटी आहे. या आधारावर आयोगाने रेल्वेला ६% व्याजासह ७० हजार रुपयांची भरपाई आणि १० हजार रुपये मानसिक त्रासापोटी व अर्जाचा खर्च म्हणून तक्रारदारास देण्याचे आदेश दिले. सामान्य ग्राहकांसाठी/प्रवाशांसाठी या निर्णयाचा मोठा फायदा वृत्तपत्रातील माहितीनुसार, या निर्णयामुळे सामान्य रेल्वे प्रवाशांना त्यांचे कायदेशीर अधिकार समजण्यास मोठी मदत होणार आहे. अनेकदा प्रवासात सामान चोरीला गेल्यास नागरिक कायदेशीर लढा देण्याऐवजी शांत बसतात. मात्र, या निर्णयामुळे आता प्रवाशांना हा विश्वास मिळाला आहे की, आरक्षित डब्यात प्रवास करताना जर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे किंवा अनाधिकृत व्यक्तींच्या प्रवेशामुळे सामान चोरीला गेले, तर रेल्वे प्रशासनाकडून हक्काची भरपाई मागता येते. प्रवाशांनी फक्त आपल्या सामानाची पावती जपून ठेवणे आणि घटनेनंतर तात्काळ झिरो एफआयआर ( ) किंवा हेल्पलाइनद्वारे नोंद करणे आवश्यक आहे, ज्यामुळे ग्राहक न्यायालयात रेल्वे प्रशासनाला जबाबदार धरून पूर्ण भरपाई मिळवता येते..

# बिल्डरची मनमानी भोवली: ज्येष्ठ नागरिकांना २.८३ कोटी रुपये व्याजासह परत करण्याचे ग्राहक आयोगाचे आदेश

**जालना - प्रतिनिधी**

घराचे स्वप्न दाखवून ग्राहकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या आणि मनमानीपणे करार रद्द करणाऱ्या विकासकाला महाराष्ट्र राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाने जोरदार दणका दिला आहे. एका महत्त्वपूर्ण निकालात, आयोगाने श्रीनिवास कॉटन मिल्स लिमिटेड आणि लोढा डेव्हलपर्स यांना ज्येष्ठ नागरिक दाम्पत्याला त्यांनी भरलेली २,८३,५९,५५४ रुपयांची रक्कम १०% व्याजासह परत करण्याचे आदेश दिले आहेत. यासोबतच मानसिक त्रासापोटी १ लाख रुपये आणि कायदेशीर खर्चासाठी ५०,००० रुपये देण्याचेही निर्देश दिले आहेत. हा निकाल ग्राहक तक्रार क्रमांक एस.सी./२७/सी.सी./२३३/२०२१ मध्ये श्री. उत्तम चॅटर्जी आणि श्रीमती अनिंदिता चॅटर्जी यांनी दाखल केलेल्या तक्रारीवर देण्यात आला.

या प्रकरणाची हकीकत अशी की, चॅटर्जी दाम्पत्याने २०१५ मध्ये सेवानिवृत्तीनंतर मिळालेल्या निधीतून लोढा डेव्हलपर्सच्या मुंबईतील वर्ल्ड क्रेस्ट प्रकल्पात सुमारे १२ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा फ्लॅट बुक केला होता. डिसेंबर २०१५ मध्ये घराचा ताबा देण्याचे आश्वासन तोंडी देण्यात आले होते, परंतु विकासकाने वेळेत ताबा दिला नाही. उलट, विकासकाच्या प्रतिनिधीने त्यांना त्याच परिसरात दुसऱ्या एका महागड्या प्रकल्पात फ्लॅट घेण्यास प्रवृत्त केले. मात्र, नंतर त्या फ्लॅटची किंमत अचानक वाढवण्यात आली आणि मोठी रक्कम तात्काळ भरण्याची मागणी करण्यात आली. याला दाम्पत्याने विरोध दर्शवून प्रकल्पातून बाहेर पडण्याची इच्छा व्यक्त केली असता, विकासकाने एकतर्फी करार रद्द करून त्यांनी भरलेली मोठी रक्कम परत देण्यास नकार दिला.

या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस धन्नावत यांनी सांगितले की, ''हा निकाल म्हणजे ग्राहक हक्कांचा मोठा विजय आहे. विकासकाने तक्रारदारांना ग्राहक नसून गुंतवणूकदार ठरवण्याचा प्रयत्न केला, जो आयोगाने पूर्णपणे फेटाळून लावला. केवळ राहण्यासाठी घेतलेल्या घराच्या किमतीत भविष्यात वाढ होण्याची अपेक्षा करणे हा व्यावसायिक हेतू ठरत नाही, हे आयोगाने स्पष्ट केले. विकासक ग्राहकाशी केलेला करार एकतर्फी रद्द करू शकत नाही आणि ग्राहकाचा पैसा अनिश्चित काळासाठी स्वतःकडे ठेवून घेऊ शकत नाही, हे या निकालाने अधोरेखित केले आहे.

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, ''विकासकाने वेळेवर ताबा न देणे, दिशाभूल करणारी आश्वासने देणे आणि ग्राहकाचा पैसा अडवून ठेवणे ही स्पष्टपणे सेवेतील त्रुटी आणि अयोग्य व्यापारी प्रथा आहे, यावर आयोगाने शिक्कामोर्तब केले आहे. ग्राहकाने वेळेवर हप्ते भरले नाहीत, असे कारण देऊन विकासकाला करार रद्द करण्याचा आणि ग्राहकाचे पैसे हडप करण्याचा कोणताही अधिकार नाही. हा निर्णय बिल्डर लॉबीच्या मनमानी कारभाराला चपराक देणारा आहे. ॲड. महेश एस धन्नावत यांच्या मते, ''या निकालातून संपूर्ण महाराष्ट्र, विशेषतः जालना सारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरांमधील विकासकांनी आणि ग्राहकांनी मोठा बोध घेण्याची गरज आहे. विकासकांनी ग्राहकांना दिलेली आश्वासने पाळली पाहिजेत आणि कायद्याचे पालन केले पाहिजे.

# हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत सायकल रॅलीचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

राज्यात दि. ९ ऑगस्ट ते दि. १७ ऑगस्ट २०२६ कालावधीत ''हर घर तिरंगा' अभियानांतर्गत'' विविध कार्यक्रमांचे व उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी जालना यांनी 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत जालना शहरात सायकल रॅलीचे १५ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ८.०० वाजता आयोजन केले आहे.

या सायकल रॅलीचे जिल्हाधिकारी कार्यालय येथून सकाळी ८.४५ वाजता अंबड चौफुली-नुतन वसाहत-रेल्वे स्टेशन-चमन-शनि मंदिर-छत्रपती संभाजी महाराज पुतळा - मोतीबाग - जिल्हाधिकारी कार्यालयामार्गे आयोजित करण्यात आली आहे. या सायकल रॅलीत जास्तीत जास्त नागरिक व विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी रामदास दौंड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# कार्यालयांचे उद्घाटन नंतर, आधी कचऱ्याचे डोंगर हटवा!
## – मुख्यमंत्री फडणवीस जालन्यात येण्यापूर्वी नागरिकांचा संताप

**जालना - प्रतिनिधी**

भाजपचा देशभरातील प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उभारण्याचा निर्धार आहे. त्याचाच भाग म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लवकरच जालन्यात येऊन भाजपच्या नव्या जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन करणार आहेत. पक्ष वाढवणे चांगले, पण ज्या जालन्यात भाजपची महापालिका सत्तेत आहे तिथली परिस्थिती काय आहे हे आधी पाहावे, अशी संतप्त प्रतिक्रिया आता समोर येत आहे.

काळीकुर्तीचा कचरा डेपो गेल्या अनेक वर्षांपासून जालनावासीयांच्या जिवावर उठला आहे. दुर्गंधी, डास, आजार आणि गायींचे प्लास्टिक खाऊन होणारे मृत्यू नित्याचे झाले आहेत. या घाणीमुळे हर घर तिरंगा अभियानातही नागरिक झेंडा लावू शकत नाहीत. कचऱ्याजवळ झेंडा लावणे म्हणजे राष्ट्रध्वजाचा अपमानच होईल. सगळ्यात धक्कादायक बाब म्हणजे, *महापालिका आयुक्तांनी मानवी हक्क आयोगासमोर प्रतिज्ञापत्र देऊन हा कचरा डेपो लवकरात लवकर हटवू, असे सांगितले होते. पण आजतागायत काहीही झाले नाही. याच कचऱ्यामुळे *९० वर्षांवरील एक ज्येष्ठ नागरिकाचा जीव गेला* आहे. तरीही प्रशासन आणि महापालिका मुग गिळून गप्प बसली आहे.

यावर ॲड. महेश धन्नावत म्हणाले, ''मुख्यमंत्री पक्षाचे कार्यालय उद्घाटन करायला येत आहेत, स्वागत आहे. पण सत्तेत असूनही जालना महापालिका एका कचरा डेपोला हात लावू शकत नाही ही लाजिरवाणी गोष्ट आहे. आयुक्तांनी आयोगाला दिलेले लेखी आश्वासन फोल ठरले. ९० वर्षांच्या ज्येष्ठाचा बळी गेला तरी महापालिका मुका प्रेक्षक बनून बसली आहे.

माननीय मुख्यमंत्रींनी इमारतीचे फित कापण्यापेक्षा काळीकुर्तीला भेट देऊन पहावी की भाजपच्या सत्तेत जनतेला काय मिळाले. कार्यालये उभी करण्याआधी आधी जनतेचे आरोग्य आणि सन्मान वाचवा, अशीच आता जालन्याची मागणी आहे.

# कर्तव्यनिष्ठ तपासाबद्दल सदर बाजार पोलिसांचा रोटरीतर्फे विशेष सन्मान

**जालना - प्रतिनिधी**

तीन वर्षांच्या चिमूकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला अवघ्या ५७ दिवसांत दोषी ठरवून नैसर्गिक आयुष्याच्या उर्वरित काळापर्यंत जन्मठेपेची शिक्षा मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या सदर बाजार पोलीस ठाण्याच्या तपास पथकाचा रोटरी क्लब ऑफ जालनाच्यावतीने विशेष सन्मान करण्यात आला.




कर्तव्यनिष्ठ तपास, प्रभावी पाठपुरावा आणि जलद न्यायप्रक्रियेसाठी सदर बाजार पोलीस ठाण्यात आयोजित विशेष सन्मान सोहळ्यात उपविभागीय पोलीस अधीक्षक अनंत कुलकर्णी, पोलीस निरीक्षक संदिप भारती यांच्यासह गुन्ह्याच्या विशेष तपास पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदसिंग साबळे, फौजदार सचिन सानप, पोलीस कर्मचारी भरत ढाकणे, धनंजय लोढे, जगन्नाथ जाधव, अजिम शेख, भगवान मुंजाळ, दुर्गेश गोफणे, रवि काळे, राहुल कटकम, धनाजी कावळे, रामप्रसाद रंगे आणि रवींद्र जायभाये यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना ज्येष्ठ रोटरियन सुनीलभाई रायठठ्ठा म्हणाले की, जालना पोलीस दल मागील दोन वर्षांपासून शालेय विद्यार्थ्यांसाठी सुरक्षा मंत्र उपक्रमाच्या माध्यमातून विशेष परिश्रम घेत आहे. तत्कालीन अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपानी आणि बाल मानस चिकित्सक मानसी नोपानी यांनी या उपक्रमाची रूपरेषा आखलेली होती. त्याबद्दल जालनेकर नेहमीच कृतज्ञ राहतील. रोटरीचे अध्यक्ष प्रशांत महाजन म्हणाले की, रोटरी क्लब शालेय विद्यार्थी, शिक्षक, पालकांसाठी बाल मानसशास्त्र व कायद्याचे संरक्षण याबाबत व्यापक जनजागृती मोहीम आणि कार्यशाळा घेत क्रिएट लास्टिंग इम्पक्ट अंतर्गत कार्यरत आहे. पोलिसांच्या योगदानाबद्दल कर्तव्य भावनेतून आम्ही कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाला रोटरी क्लब ऑफ जालनाचे सचिव संदीप मुंदडा, क्लबचे पदाधिकारी अरुण अग्रवाल, रमेश मगरे, विनोद मोतीवाला, डॉ. दीपक बगडिया, हेमंत ठक्कर, शरद काबरा, सामाजिक कार्यकर्ते डॉ. विठ्ठल राजकर, उदय शिंदे उपस्थित होते.






दैनिक युवा आदर्शच्या कार्यालय स्थलांतर निमित्ताने पत्रकार बांधवांनी सदिच्छा भेट दिली प्रसंगी संपादक दीपक शेळके यांचे अभिनंदन करतांना पहिल्या छायाचित्रात पत्रकार लहू गाढे, दुसऱ्या छायाचित्रात विजय तौर, तिसऱ्या छायाचित्रता सय्यद सलमान तर चौथ्या छायाचित्रात सय्यद गणी.

# अंमली पदार्थांच्या गैरवापराविरुद्ध १८ ऑगस्टला जालना येथे राष्ट्रीय शपथ

**जालना - प्रतिनिधी**

अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराविरोधात जनजागृती निर्माण करण्यासाठी केंद्र शासनाच्या निर्देशानुसार देशभरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने 'नशा मुक्त भारत, विकसित भारत' अभियानांतर्गत जालना जिल्ह्यात अंमली पदार्थाच्या गैरवापराविरुद्ध राष्ट्रीय शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मंगळवार, दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद कार्यालय, जालना येथे होणार आहे.

संयुक्त राष्ट्र महासभेच्या डिसेंबर १९८७ मध्ये झालेल्या ठरावानुसार दरवर्षी २६ जून हा दिवस 'अंमली पदार्थांचा गैरवापर आणि बेकायदेशीर तस्करीविरुद्ध आंतरराष्ट्रीय दिवस' म्हणून पाळला जातो. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करणे, तसेच समाजाला अंमली पदार्थांच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी व्यापक लोकसहभाग निर्माण करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

भारत सरकारने अंमली पदार्थांच्या धोक्याविरुद्ध लढण्यासाठी 'ड्रग्ज मुक्त भारत' संकल्प निश्चित केला असून, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो () यांच्या माध्यमातून 'नशा मुक्त भारत, विकसित भारत' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून विशेषतः युवकांमध्ये अंमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम याबाबत जागृती करण्यात येत आहे. जालना जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे विभागप्रमुख व अधिनस्त कार्यालये यांच्या सहभागातून हा शपथ कार्यक्रम घेण्यात येणार आहे. त्याचबरोबर महिला मंडळे, युवक मंडळे, स्थानिक स्वयंसेवी संस्था, अनुदानित संस्था, महाविद्यालये, माध्यमिक व प्राथमिक विद्यालये, दिव्यांग संस्था, आश्रमशाळा, जिल्हा रुग्णालय, बसस्थानक व रेल्वे स्टेशन परिसरातील नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक कार्यकर्ते यांनाही या उपक्रमात सहभागी करून घेण्यात येणार आहे. अंमली पदार्थांचे सेवन ही केवळ व्यक्तीची समस्या नसून त्याचा परिणाम कुटुंब, समाज आणि देशाच्या भवितव्यावर होत असतो. त्यामुळे अंमली पदार्थांच्या विरोधातील लढ्याला लोकसहभागाची जोड देणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अंमली पदार्थांच्या गैरवापराविरुद्ध राष्ट्रीय शपथ घ्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त समाजकल्याण डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**ऑनलाइन शपथ घेण्याचेही आवाहन**

नागरिकांना कार्यक्रमस्थळी उपस्थित राहण्याबरोबरच ऑनलाइन पद्धतीनेही अंमली पदार्थांच्या गैरवापराविरुद्ध शपथ घेता येणार आहे. यासाठी या संकेतस्थळावर ऑनलाइन शपथ घेऊन त्याचे प्रमाणपत्र प्राप्त करावे. तसेच शपथ घेतल्याचे छायाचित्र संकेतस्थळावर अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आंतरराष्ट्रीय युवा दिन व 'हर घर तिरंगा' जनजागृती रॅली उत्साहात

**(दत्ता देशमुख)**

आंतरराष्ट्रीय युवा दिन तसेच स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सविता शिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. श्याम सर्जे यांची प्रमुख उपस्थिती होती.



रॅलीमध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी 'हर घर तिरंगा', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. रॅलीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाविषयी आदर, देशभक्तीची भावना आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य (पान २ वर)

# सौ. वर्षा पित्ती यांना रोटरी इंटरनॅशनल प्रांतातील 'सर्वोत्कृष्ट अध्यक्ष' पुरस्कार

## प्रांतीय सोहळ्यात जालना रोटरी क्लबचा २४ मानाच्या पुरस्कारांनी सन्मान

**जालना -प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी आणि निस्वार्थ सेवाभावाच्या बळावर जालना रोटरी क्लबने रोटरी वर्ष २०२५-२६ मध्ये रोटरी इंटरनॅशनलच्या प्रांत-३१३२ मध्ये आपला ऐतिहासिक ठसा उमटवला आहे. वर्षभरात राबविलेल्या लोकोपयोगी आणि प्रभावी उपक्रमांची दखल घेत, या प्रांतीय सोहळ्यात जालना रोटरी क्लबला तब्बल २४ प्रतिष्ठित पुरस्कार व सन्मानांनी गौरवण्यात आले. या संपूर्ण सोहळ्यात सर्वात मोठा आणि अभिमानास्पद बहुमान म्हणजे क्लबच्या अध्यक्षा सौ. वर्षा सुरेंद्र पित्ती यांना प्रांतातील 'सर्वोत्कृष्ट अध्यक्ष' म्हणून गौरविण्यात आले. हा प्रथम पुरस्कार पटकावणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत, ज्यामुळे जालना जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.





लातूर येथे पार पडलेल्या या भव्य गौरव सोहळ्यात प्रांतपाल जयेश पटेल, माजी प्रांतपाल सुधीर लातूरे, सहाय्यक प्रांतपाल सरिता लोणीकर आदी मान्यवरांच्या हस्ते सौ. वर्षा पित्ती यांना प्रांतातील सर्वोत्कृष्ट अध्यक्ष व प्लॅटिनम रोटरियन म्हणून सन्मानित करण्यात आले. सेवा, समर्पण आणि उत्कृष्ट नियोजनाचे प्रतीक ठरलेल्या जालना रोटरी क्लबला क्लब एक्सलन्स अवॉर्ड, सर्वोत्कृष्ट प्रशासकीय क्लब, रोटरी फाउंडेशनला सर्वाधिक योगदान, सर्वोत्कृष्ट व्यवस्थापन रोटरी क्लब ट्रस्ट, पर्यावरण संरक्षण, साक्षरता उपक्रम, संतुलित कार्यक्रम क्लब, आंतरराष्ट्रीय सेवा, सर्वाधिक रक्तदानासाठी, सर्वोत्कृष्ट साप्ताहिक सभा, मुलींच्या शिक्षण प्रकल्पासाठी, पोलिओप्लस सोसायटी चॅम्पियन क्लब, पहिल्या क्लब एन्डोवमेंट फंडसाठी विशेष प्रशंसा पुरस्कार, जोडी कमाल की व सात सीएसआर प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी विशेष पुरस्कार, महादाता (पान २ वर)

# व्ही. एस. एस. फार्मसी महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा

**बदनापूर -प्रतिनिधी**


बदनापूर येथील व्ही. एस. एस. फार्मसी महाविद्यालयात भारतातील ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय ग्रंथपाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे सचिव डॉ. शिवाजीराव मदन आणि संस्थेचे संचालक तथा प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. राहुल एस. अंभोरे, संचालिका डॉ. पूजा मदन, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जेडगे, उपप्राचार्य प्रा. गुलशन राठी, शाळेचे मुख्याध्यापक प्रा. प्रवीण



जाधव, प्रा. शुभम मोहिते, ग्रंथपाल प्रा. सोनाली कुलकर्णी तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती मातेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. सोनाली कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शुभम मोहिते यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य प्रा. गुलशन राठी यांनी केले.

यावेळी संचालिका डॉ. पूजा मदन यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध पुस्तकांची माहिती होणे, तसेच बदलत्या काळानुसार ग्रंथालयात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जेडगे यांनी, ''पुस्तक हे माणसाचे मन निर्मळ करणारे एक प्रभावी साधन आहे,'' असे सांगत विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाची सवय लावून घ्यावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सहाय्यक प्राध्यापक प्रा. डॉ. राहुल एस. अंभोरे (ग्रंथपाल, श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना) यांनी ग्रंथालय व्यवस्थापन, डिजिटल ग्रंथालये (पान २ वर)




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.